# प्रेस नोट

अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव

दि.०२.०२.२०२३

आलोसे हेमंत दत्तात्रय बडगुजर, वय–५७,सहाय्यक अधिक्षक, कौटुंबिक न्यायालय,जुने बी.जे.मार्केट, जळगांव रा. प्लॉट नं.१४, इंद्रप्रस्थ नगर, शिवाजी नगर जवळ जळगांव,ता.जि.जळगांव यांना २००/–रुपये लाचेची मागणी करुन सदर लाच रक्कम पंचासमक्ष स्वत: स्वीकारंताना ला.प्र.विभाग,जळगांव यांची कारवाई.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | घटक | :– | जळगांव. |
| २ | गुन्हा नोंद कमांक | :– | जिल्हापेठ पो.स्टे. गु.र.नं.६०/२०२३ |
| ३ | कलम | :– | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम–७ प्रमाणे. |
| ४ | आरोपीचे नांव व कार्यालय | :– | हेमंत दत्तात्रय बडगुजर, वय–५७,सहाय्यक अधिक्षक, कौटुंबिक न्यायालय,जुने बी.जे.मार्केट, जळगांव रा.प्लॉट नं.१४, इंद्रप्रस्थ नगर, शिवाजी नगर जवळ जळगांव,ता.जि.जळगांव **(खाते विधी व न्यायविभाग, वर्ग ३)** |
| ५ | मागणी केलेली लाचेची तारीख व रक्कम | :– | दि.०२/०२/२०२३<br>२००/– रुपये |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | :– | २००/– रुपये. |
| ७ | गुन्हा दाखल तारीख | :– | दि.०२/०२/२०२३ |
| ८ | थोडक्यात माहीती | :– | यातील फिर्यादी व त्यांची पत्नी यांचे आपआपसात कौटुंबिक वाद असुन फिर्यादी यांनी त्यांची पत्नी नांदायला यावी म्हणुन त्यांनी कौटुंबिक न्यायालय जळगांव येथे दावा दाखल केला होता. त्याप्रमाणे फिर्यादी यांची पत्नी हर्षा हिने देखील फिर्यादी विरुध्द अंतरिम खावटी व न्यायालय खर्चाची रक्कम मिळणेसाठीचा अर्ज दाखल केला आहे.त्यानुसार मा.न्यायालयाने फिर्यादी यांना ५०००/–रु.प्रमाणे खावटीची रक्कम देण्याचे आदेश दिले होते.परंतु फिर्यादीच्या पत्नीने थकीत खावटीची ८५,०००/–रुपये एकरकमी रक्कम मिळणे बाबत कौटुंबिक न्यायालय जळगांव येथे माहे ०८/२०२२ मध्ये दरखास्त अर्ज दाखल केला आहे.<br>फिर्यादीच्या पत्नीने दिलेल्या अर्जावर सुनावणी साठी फिर्यादी यांना दि.०२.०१.२०२३ रोजी समन्स व्दारे मा.कौटुंबिक न्यायालय,जळगांव येथे हजर राहण्याचा आदेश झाला होता. त्याप्रमाणे फिर्यादी हे दि.०२.०१.२०२३ रोजी मा.कौटुंबिक न्यायालय, जळगांव येथे हजर राहुन कोर्टातील सहाय्यक अधिक्षक बडगुजर यांची भेट घेतली त्यावेळी फिर्यादीने अंतरीम खावटीची थकीत रक्कम एकदम जमविण्यास वेळ लागेल असे सांगीतले. त्यासाठी मला पुढील तारीख देण्याबाबत विनंती केली असता तेव्हा सहाय्यक अधिक्षक बडगुजर यांनी फिर्यादीस दि.०२.०२.२०२३ ही तारीख देवुन सदर तारखेच्या आत भेटण्यासाठी बोलविले होते. त्यानुसार फिर्यादी हे दि.१९.०१.२०२३ रोजी सहाय्यक अधिक्षक बडगुजर यांना जावुन भेटले असता त्यांनी फिर्यादीस तुमच्या प्रकरण सुनवणीची तारीख ०२.०२.२०२३ ठेवलेली आहे. त्यावेळेस मी तुम्हाला महिना पंधरा दिवस लांबची तारीख देईल असे सांगुन २००/–रूपये लाच रकमेची मागणी केली होती. त्याबाबत फिर्यादी यांनी दि.०२.०२.२०२३ रोजी ला.प्र.वि.जळगांव कार्यालयात तक्रार दिली होती.<br>सदर तक्रारीची ला.प्र.वि.जळगाव पथकाने दोन पंचासमक्ष दि.०२.०२.२०२३ रोजी पडताळणी केली असता आलोसे यांनी फिर्यादीच्या पत्नीने फिर्यादी विरुध्द अंतरीम खावटीची थकीत रक्कम मिळणेसाठीच्या केलेल्या अर्जावर वकिलामार्फत म्हणणे सादर करण्यासाठी व थकीत रक्कम एकरकमी भरण्यासाठी पुढील तारीख वाढवुन देण्याच्या मोबदल्यात फिर्यादीकडे २००/– रुपयांची लाच मागणी करुन, सदर लाचेची रक्कम वर नमुद ठिकाणी स्विकारली. म्हणुन गुन्हा. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकांबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगांव कार्यालयात संपर्क करावा.

**संपर्क पत्ता:–** अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय,जळगांव,जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,अल्पबचत भवन बिल्डींग,जळगांव.

**ईमेल आयडी:–** dyspacbjalgaon@gmail.com

**संकेतस्थळ:–** acbmaharastra.gov.in

**टोल फ्री कमांक:–** 1064,**दुरध्वनी कमांक:–**0257-2235477

**व्हॉटस्अॅप कमांक:–** 8766412529

पोलीस उप अधिक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो, जळगांव

02.2.2023

**शशिकांत श्रीराम पाटील**
**पोलीस उप अधिक्षक**
**अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव**